तेलंगणातील सांस्कृतिक सण

‘बतुकम्मा’

- श्रीपाद राऊतवाड

बतुकम्मा

हे पुस्तक विनामूल्य आहे

पण फ़ुकट नाही

हे वाचल्यावर खर्च करा ३ मिनिट

१ मिनिट : लेखकांना फ़ोन करून हे पुस्तक कसे वाटले ते कळवा

१ मिनिट : ई साहित्य प्रतिष्ठानला मेल करून हे पुस्तक कसे वाटले ते कळवा.

१ मिनिट : आपले मित्र व ओळखीच्या सर्व मराठी लोकांना या पुस्तकाबद्दल अणि ई साहित्यबद्दल सांगा.

असे न केल्यास यापुढे आपल्याला पुस्तके मिळणे बंद होऊ शकते.

दाम नाही मागत. मागत आहे दाद.
साद आहे आमची. हवा प्रतिसाद.

दाद म्हणजे स्तुतीच असावी असे नाही. प्रांजळ मत, सूचना, टीका, विरोधी मत यांचे स्वागत आहे. प्रामाणिक मत असावे. ज्यामुळे लेखकाला प्रगती करण्यासाठी दिशा ठरवण्यात मदत होते. मराठीत अधिक कसदार लेखन व्हावे आणि त्यातून वाचक अधिकाधिक प्रगल्भ व्हावा, आणि अखेर संपूर्ण समाज एका नव्या प्रबुद्ध उंचीवर जात रहावा.

ई साहित्य प्रतिष्ठान

सादर करत आहे

'बतूकम्मा'

(सांस्कृतिक सण)

• लेखक •

श्रीपाद नागनाथ राऊतवाड

★ बतुकम्मा (सांस्कृतिक सण)

श्रीपाद नागनाथ राऊतवाड

पत्ता:- मदनूर जि. कामारेड्डी (तेलंगणा)

मो. 9970052837

मेल:- Srautwad@gmail.com

या पुस्तकातील लेखनाचे सर्व हक्क लेखकाकडे सुरक्षित असून, पुस्तकाचे व त्यातील अंशाचे पुनमूर्द्रण व नाट्य,चित्रपट किव्हा इतर रूपांतर करण्यासाठी लेखकांची लेखी परवानगी घेणे अस्वशक आहे.तसे न केल्यास कायदेशीर कारवाई होऊ शकते.

This declaration is as per the Copyright Act 1957. Copyright protection in India is available for any literary dramatic, musical, sound recording and artistic work. The Copyright Act 1957 provides for registration of such works. Although an author's copyright in a work is recognised even without registration. Infringement of copyright entitles the owner to remedies of injunction, damages and accounts.

प्रकाशक :- ई साहित्य प्रतिष्ठान

www.esahity.com

प्रकाशन :- 28 Sept 2019

©esahity Pratishthan®2019

- विना मूल्य वितरणासाठी उपलब्ध
- आपले वाचून झाल्यावर आपण फॉरवर्ड करू शकता
- हे पुस्तक वेबसाईटवर ठेवण्यापूर्वी किव्हा वाचना वैतरिक्त कोणताही वापर करण्यापूर्वी ईसाहित्य प्रतिष्ठाण ची लेखी परवानगी आवश्यक आहे.

●लेखकांचा अल्प परिचय

श्रीपाद नागनाथ राऊतवाड

पत्ता:- मदनूर जि. कामारेड्डी (तेलंगणा)

मो. 9970052837

मेल:- Srautwad@gmail.com

व्यवसाय :- स्थापत्य अभियांत्रिकी विद्यार्थी

Blog :- http:// shripadrautwad. blogspot. com

संचालक :- शब्दांचीच रत्ने (युट्युब चॅनेल)

पुरस्कार :- राष्ट्रीय साहित्य सेवारत्न- २०१८

प्रकाशीत साहित्य :- १) स्त्री (वैचारिक पुस्तक)

२) माणुसकी (वैचारिक पुस्तक)

●अर्पण पत्रिका

मझ्यात तेलगू व मराठी या दोन्ही संस्कृतीचे संस्कार करणारे,व माझ्यात प्रत्यक्ष व अप्रत्यक्षपणे लेखन कला निर्माण करणारे माझे पहिले गुरू आई-वडिलांच्या चरणी अर्पण..

(वडील - नागनाथ राऊतवाड ,आई:-रेणुका राऊतवाड)

मनोगत

बतुकम्मा हा सण अगदी प्राचीन आहे,या सणाला जवळपास एक हजार वर्षाचा इतिहास आहे. तेलंगणात हा सण प्रामुख्याने महत्वाचे मानले जाते. निसर्गाच्या सानिध्यात आणि त्या पावसाने पसरलेल्या हिरवीगार सह्याद्रीत,शेतात दौलणाऱ्या पिकांच्या आनंदात,पालवी फुटलेल्या फुलांच्या सुगंधात हा सण अगदी जल्लोषात साजरी केली जाते. नुकतेच पालवी फुटलेल्या फुलांचा बतुकम्मा साठी वापर होतो. या निसर्गाच्या स्वागतार्ह हा सण साजरा केले जाते असेही म्हटल्या जाते.

तेलंगणा बरोबरच हा सण महाराष्ट्र व कर्नाटकातील काही भागात साजरी केले जाते. मध्ययुगीन इतिहासात या सणाला थोडंस वेगळं वळण मिळले होते. १७२० च्या दशकात जेव्हा उस्मान अली खान यांच्या सत्ताशहीने म्हणजेच हैद्राबादचे निजामशाहीने तेलंगणा,मराठवाडा व कर्नाटकात आपली सत्ता स्थापित केले,त्यातील ग्रामीण भागातील वतनदार,देशमुख, पाटीलांनी काही भागात या सणाला स्त्रियांना नग्न अवस्थेत बतुकम्मा खेळण्यास लावले असे निच्छ कृत्य मध्यकालीन इतिहासात घडले,या अश्या पवित्र सणाला गालगोट लावण्याच काम त्या वतनदाराणी केलं. ही पवित्रता, स्त्रियांच्या सन्मानार्थ सुरू झालेल्या सणाला लागलेला ही कीड

तब्बल १९४८ म्हणजे स्वतंत्र भारतात हा राष्ट्र सहभागी झाला तो पर्यंत चालत आलं.. मात्र पुढे आपली संस्कृती आपली ओळख या ब्रीदावलीने तेलंगणातील नागरिकांनी उत्साहाने हा सण साजरी करू लागले..

या सणाचा ऐतिहासिक वारसा व काही लोकगीतातून सांगितल्या जाणारे कथन आणि सणांचे रूपरेषा व प्रकार या सर्व गोष्टीचा सविस्तरपणे माहिती या पुस्तकात मी मांडण्याचा प्रयत्न केला आहे. नवरात्रीच्या पूर्वसंधेला या सणाचा प्रारंभ होतो व तब्बल नऊ दिवस म्हणजेच विजया दशमीच्या आदल्या दिवशी मोठ्या उत्साहात संपन्न होतो. असे एकूण नऊ दिवसांचा आनंद उत्साह,जल्लोष पाहायला मिळते.. खरेतर या सणाला एक महिन्या आधी पासून सुरवात होते, नित्यनेमाने नियमित शेणाचा बतुकम्मा ही बनवल्या जाते.आणि ते एक महिना आधीपासूनच खेळले जाते. हे आजही अनेक ग्रामीण भागात चालत. बतुकम्माची चाहूल लागताच लहानग्या पासून थोरांपर्यंत या उत्सवाची आतुरता असते. असे तेलंगणाच्या तेलगू सांस्कृतित अजरामर ठरलेलं हे बतुकम्मा सण कसा पवित्र व प्रसिद्ध आहे या सर्व गोष्टीचा उलगडा करून आपल्या हाती हा पुस्तक देत आहे...

- श्रीपाद राऊतवाड

भारतदेश हा सण,संस्कृतीने नटलेला देश आहे, प्रत्येक राज्यात विविध जाती धर्माचे विवीध सण,उत्सव आनंदाने साजरी करतात,काही राज्यांचे विशिष्ट सण,उत्सव असतात, प्राचीन संस्कृतीला जपत परंपरागत चालत आलेल्या उत्सवांना आनंदाने साजरी करतात. तेलंगणा राज्याला जवळपास पाच हजार वर्षा पासूनचा संस्कृतीक इतिहास आहे. हिंदूंचे काकतीया वंश,मुस्लिमचे कुतुबशाही आणि आसफ जाही राजवंश ज्यास हैद्राबादचे निजाम म्हटले गेले. इत्यादी शासक राजवंशाच्या शाही गादींच्या इतिहासाने भारतातील हा एक लक्षवेधी सांस्कृतिक राष्ट्र बनला. कला व संस्कृती ने तेलंगणा राज्याला दिलेल्या बहू सांस्कृतिक राष्ट्राची उपमा आजच्या परंपरा तश्याच चालत आलेल्या सांस्कृतिक उत्सव,महोत्सव कडे पाहून आजही हा राष्ट्र सांस्कृतिक दृष्ट्या एक प्रमुखच बनलं. 'काकतीया महोत्सव असो दक्कन महोत्सव' या सारख्या अनेक हिंदू सणा सोबतच बोणालू,बतुकम्मा,उगादी,दशरा, संक्रांती,मिलद अन नबी आणि रमजान हे इथले प्रमुख सण आहेत.मात्र या सणातील राष्ट्रीय सण मानल्या जाणारा सण म्हणजे बतुकम्मा.हा सण गेले एक हजार वर्षांपासून साजरी केली जाते,या सणाला तेलंगणात सर्वात जास्त महत्व दिले आहे.

नेमका बतुकम्मा काय आहे ? हा सणाचा अर्थ काय , हा सण का साजरा केल्या जातो, या सर्व गोष्टीचा आपण एक एक करून अभ्यास करूया..यावर अनेक लोकगीत ही उपलब्ध आहेत,ते आजही इथल्या मातीत गायले जातात, या लोकगीतातून काही दंत कथेही ऐकवल्या गेले आहेत. त्याचाही आपण सविस्तर विचार करूया.

प्रथमतः बतुकम्मा, या शब्दाचा अर्थ पाहूया ,'बतूकू' म्हणजे जीवन, 'अम्मा' म्हणजे आई, मानवी जीवन देणाऱ्या आई अस अर्थाचा निकष निघतो.म्हणजे एकाद्या दैवताला प्रसन्न करून 'आमच्या सुखदुःखात तू सदैव हयातीत राहून आमचं पालन कर' असं साधा अर्थ आपण त्यास देऊ शकतो.

यावर इथल्या लोकांची एक आस्था असते की बतुकम्मा हे आमच्या समवेत सदैव असते,आमच्या सर्व समस्यांना ती सावरत असते, तिच्या उदंड आयुष्यासाठी हा सण भल्या उत्स्फूर्तपणे साजरी केल्या जाते. पण या मागचा इतिहास काय?, कैक वर्षेंपासून हा सण आम्ही पाहत आलोय,ऐकत आलोय..या उत्सवामागे अनेक दंतकथा जोडले गेले,ते अनेक लोकगीतातून ऐकवल्या जाते. अशीच एक कथा : चाल वंशाचे राजा धर्मांना व त्यांची पत्नी सत्यवती यांच्या राजकुंटाशी जोडले गेलेले ही एक कथा, या महाराजांस एकूण शंभर संतान होते ते एका युद्धात सरसकट शहीद झाले याच दुःख महाराजा धर्मांना व राणी सत्यवती यांना कधी सावरता आलं नाही, शेवटी राजांनी आपलं सर्व राजवट सोडून आपल्या पत्नीसमवेत वनवासी गेला, दऱ्या खोऱ्यात जंगल कपाऱ्यात वन वन भटकत राहिला,परमेश्वराची अफ़ार निष्ठा ठेवत त्यास पुत्राचे वरदानही मागितलं, कृपा दृष्टीने त्यास कन्या प्राप्त झाली. राजा धर्मांना व राणी सत्यवती फार

आनंदी झाले. आपले आधीचे संतान गमावल्याच दुःख पचवत,आणि अश्या अनेक संकटातून जो आपण प्रवास केला, यापुढे पुत्रीस धोका होऊ नये,अश्या विचारानी त्यांनी तीच नामकरण केलं 'बतुकम्मा' म्हणजेच तू जगले पाहिजे. तुझ्यावरील अनेक संकटाना सामना करत तू या विश्वास जगवल पाहिजे असं आस्था बाळगून बतुकम्मा अस तीच नामकरण केलं गेलं.. ही कथा आजही अनेक लोकगीतातून सांगितल्या जात, अस म्हणतात हा सण त्या वेळी उदयास आले. आणि आजवर ती संस्कृती आपण पुढे नेत आलोय,मात्र प्रत्येक दंतकथा कडे पाहिलं तर प्रत्येक कथा काही वेगळं सांगते. या कथेच संबंद असलेलं तेलगू भाषेतली ही लोकगीत

बतक्म्मा बतकम्मा उय्यालो,

बंगारू बतकम्मा उय्यालो/

आनाटी कलाना उय्यालो,

धर्मांगुडनु राजु उय्यालो/

आ राजु भार्यायु उय्यालो,

अति सत्यवती अंदुरु उय्यालो/ ...../

कलिकी लक्ष्मीनि गूर्ची उय्यालो,

गनता पोंदिरिंका उय्यालो/ ..../

सत्यवती गर्भमुना उय्यालो,

जनियिंचे श्रीलक्ष्मी उय्यालो.

'उय्यालो' म्हणजे जन्मलेल्या बाळाला पाळण्यात दिल्या जाणाऱ्या झोक्यास म्हटल्या जाते.

लोकगीतातून प्रचलित होत असलेली ही कथा आपण पाहिलोत.या असे अनेक कथा अनेकांच्या तोंडून ऐकायला मिळतात,ज्याचं शोध मोहीम घेत गेल्यावर हजारो कथा उदयास येतात. प्रत्येक प्रांत आपापल्या परीने कथन करत गेले,त्या नुसार लोकगीतही रचल्या गेलं.तेलुगू भाषेत त्यास 'जानापदालू' म्हटले जाते. की जे गीत आज बतुकम्माच्या भोवती महिलावर्ग गात प्रदक्षना घालत असतात..

अत्ता अजून एक कथा सांगितल्या जात तेही आपण पाहूया,ही एक छोटीशी संदेशात्मक कथा आहे.

पूर्वी पुरुष प्रधान परिस्थिती त्यात महिलांना केवळ भोग वस्तू समजल्या जात,तिला दुय्यम स्थान दिल्या जात,शिक्षण/स्वतंत्र पासून कोसो दूर ठेवल्या गेलं,अश्या परिस्थितीत एक तरुण मुलीने आपल्यावर होत असलेल्या बलात्कार/अत्याचार सहन न झाल्याने तिने आत्महत्या केल्याची सांगितल्या जात,या अश्या पुरुष प्रधान राष्ट्रात महिलांना स्वातंत्र्य मिळावे, आमच्यावर होणाऱ्या या अत्याचारापासून सुटका मिळावे यासाठी महिलांनी त्या मृतपावलेल्या बालिकेच नाव बतुकम्मा ठेवून,परमेश्वराला आपल्या मदतीची हाक देत हा सणाचा उगम केल्याच सांगितल्या जातात. यातूनही महिलांवर होणाऱ्या अत्याचार रोखण्यासाठी, आपल्या सुरक्षेसाठी महिलांनी पुढारलेले पाऊल आपणास पहायला मिळते.

ही एक कथा या अनुषंगाने आपण पाहिलोत, यापुढे आपण अजून एक कथा पाहु की यास तेलंगणात अधिक रित्या बतुकम्मा ची अधिकृत कथा मानली जाते.

बतुकम्मा हा सण कसा आला?,या तेलंगणा राज्यातील जनतेस एवढा प्रिय का ठरला.? या प्रश्नांचा शोध घेतांना एक हजार वर्षांपूर्वी डोकावून पाहावे लागले. इथल्या मातीत आजही त्या राज्यांचे गुणगान गायले जाते. या कथेस अनुसरून अनेक लोकगीत ही प्रसिद्ध आहेत,की जे आज

अधिकरित्या महिला वर्ग बतुकम्मा खेळतांना गात असतात.तेलंगणात आज प्रसिद्ध व आराध्य दैवत मानल्या जाणाऱ्या वेमुलवाडा मंदिरास जोडून ही कथा आहे चला पाहूया... वेमुलावाडाचा चालुक्य राजा,राष्ट्रकूट राजा यांच्या जहागीरदार होता, चोला राजा व राष्ट्रकूट राजा यांच्यात झालेल्या युद्धात चालुक्य राजाने राष्ट्रकूट राजांना साथ दिली होती. इ.सण.९७३ साली राजा राष्ट्रकुट यांचा जहागीरदार द्वितीय थैलापुदू ने अखेर द्वितीय राजा कर्कुदु यांचा पराभव केला. आणि आपला एक स्वातंत्र कल्याणी चालुक्य स्वराज्याची स्थापना केली.आत्ताच तेलंगणा राज्य त्याच स्वराज्याचा भाग आहे. वेमुलावाडाच्या स्वराज्यात राजा राजेश्वर यांचा मंदिर फार प्रसिद्ध होता. तेलंगणाच्या जनतेचे आराध्य दैवत मानले जात. चोला च्या राजा परानतका सुंदरा, राष्ट्रकूट राज्याच्या युद्ध समयी फार घाबरले होते.तेव्हा राजा राजेश्वर यांच्या कडे मदतीस गेला. व राजा राजेश्वर यांचा तो भक्त ही बनला,स्वतःच्या मुलाचे नाव देखील राजा राजा ठेवला. या राजा राजा ने इ.सण. ९८५ पासून इ.सण. १०१४ पर्यत या राज्याची गादी सांभाळली. त्यांचा मुलगा राजेंद्र चोला हा सेनापती होते, सत्यस्त्राय यांच्या हमलावर विजय मिळवून ,राजा राजेश्वर यांच भव्य मंदिर धुळीस मिळवलं व आपल्या पिताच्या स्मरणार्थ एक मोठा शिवलिंग तिथे स्थापना केला. सण १००६ साली या शिवलिंगास मोठा मंदिर बांधणीला

सुरवात करून १०१० साली ते भव्य ब्रिहदेश्वारा या नावाने उभारलं. यामुळे अफाट भक्ती असलेल्या आपल्या राजा राजेश्वर यांच्या मंदिराचा नायनाट केलेला पाहून तेलंगणातील जनता फार दुःखी झाले.तेव्हा पासून येथील तेलंगणा सोडलेल्या ब्रुहदम्मा (पार्वती) यांच्या दुःखाला कमी करण्यासाठी बतूकम्मा ची सुरवात झाली. बतुकम्मा हे नाव ब्रुह्दम्मा या शब्दातून आलेला आहे. बहुजनांचे आराध्य दैवत मानल्या गेलेल्या शिव-पार्वतीला खुश करण्यासाठी गेल्या १००० वर्षांपासून हा सण साजरा केली जाते. अस मान्यता पावलेली ही कथा..

हा सण कधी साजरी केल्या जाते...?

हा सण पावसाळ्याच्या शेवट व हिवाळ्याच्या सुरवात करणाऱ्या आठवड्यात साजरा केले जाते,हा सण इंग्रजी कालदर्शिके नुसार ऑक्टोबर व नोव्हेंबर या दोन महिन्यात येते तर हिंदू पंचांगा नुसार भाद्रपद अमावस्या पासून हा सण प्रारंभ होते तर विजया दशमीच्या आदल्या दिवशी पर्यत सुरू असते.हा सण नैसर्गिक दृष्ट्या महत्वाचे मानले जाते, जे बदलत्या ऋतू मानावर आधारित,निसर्गाच्या हिरवळीत, पावसाने आपल्यावर केलेल्या सुखवृष्टीने सुखावलेल्या शेतकऱ्याचे चेहऱ्यावरील आनंद आणि त्या आनंदात नऊ दिवस चालणार हा सण प्रामुख्याने तेलंगणा राज्याचा महत्वाचा सण मानल्या जाते,तेलंगणा प्रशासनाने बतुकम्मा व दसरा या प्रमुख सना निमित्त शाळा महाविद्यालयास १५ दिवसाची राष्ट्रीय सुट्या देखील जाहीर केले आहेत. विविध रंगीबेरंगी फुलांनी नटलेला हा बतुकम्मा तेलंगणा चा संस्कृतीक इतिहास अजूनही त्याच रंगीबेरंगी उत्साहात जपून ठेवले आहेत.

बतुकम्मा हा सण प्रामुख्याने नऊ दिवस साजरी केल्या जात,तेलंगणाच्या सीमेवरील कर्नाटक व महाराष्ट्रातल्या चंद्रपूर, गडचिरोली, नांदेड, अश्या बऱ्याच ठिकाणी बतुकम्मा सण साजरा केल्या जात. काही भागात बुडम्मा असेही म्हटले जाते.

या सणास घरातील पुरुष मंडळी गावशेजारील शेत,डोंगरातून विविध रंगाचे,प्रकाराचे फुल घेऊन येतात त्यात,कमल,कुकुर्बात्ता,कुसमिस

पत्ता,मेरीगोल्ड,सेन्ना, अश्या विविध जातीच्या फुलांचा समावेश असतो. तेलुगुत तंगेड नावच फुल आहे हे प्रामुख्याने तेलंगणाचे राष्ट्रीय फुल मानल्या गेलं,अधिकरित्या या फुलाचा बतुकम्मा बनवल्या जातात..

नऊ दिवस विविध नावे बतुकम्मा पाळल्या जाते. ते आपण पाहूया..

पहिला दिवस :- येंगिली पुला बतुकम्मा

भाद्रपद अमावस्यास प्रारंभ होणार सण या पहिल्या दिवसास 'येंगिली पुला बतुकम्मा' म्हणतात याच अमावस्येस पितृ अमावास्या ही म्हटल्या जात, या दिवशी घरातील मृतपावलेल्या मोठ्यांना निवेद ठेवल्या जात. नंतर फुलांनी सजलेल्या बतुकम्मा तयार केले जाते,आणि घरातील स्त्रिया,बालिका लोकगीतांच्या गायनाने खेळल्या जाते. आजच्या दिवशी माँ गौरी देवीस तिळ साखर गूळ मिसळून त्याचे निवेद बनवल्या जाते.

दुसरा दिवस :- अटकूला बतुकम्मा

दुसऱ्या दिवशी माँ दुर्गा देवीस प्रसाद म्हणून दाळ, गूळ आणि त्यात पोहे मिसळून बनवल्या जाता. या दिवशी ही बतुकम्मा उत्साहात खेळल्या जाते.

तिसरा दिवस :- मुदापप्पु बतुकम्मा

तिसऱ्या दिवशीस मुदापप्पु बतुकम्मा म्हटल्या जाते,म्हणजे शिजवलेला डाळ.. आजच्या दिवशी शिजवलेल्या डाळीत गूळ मिसळून प्रसाद बनवल्या जाते. आणि बतुकम्मा खेळल्या जात.

चौथा दिवस :- नाना पेंटीना बिय्यम बतुकम्मा

चौथ्या दिवशी नाना पेंटीना बिय्यम बतुकम्मा अस म्हटल्या जाते, म्हणजे भिजवलेले तांदूळ अस अर्थ होतो,या दिवशी तांदूळ भिजवून प्रसाद बनवल्या जाते. आणि बतुकम्मा उत्साहाने खेळल्या जाते .

पाचवा दिवस :- अटला बतुकम्मा

पाचव्या दिवशी अटला बतुकम्मा असे म्हटले जाते, अटला म्हणजे तांदुळाच्या पिठापासून बनवलेले धपाटा सारख पदार्थ त्या नावे आजचा दिवस साजरी केल्या जाते,तेच प्रसाद म्हणून बनवल्या जाते. आणि आनंदात बतुकम्मा खेळल्याही जाते.

सहावा दिवस :- अलकाला बतुकम्मा

सहाव्या दिवसास अलकाला बतुकम्मा अस म्हटले जाते, या दिवशी प्रसाद काहीही करत नाहीत, आजचा दिवस फक्त लोकगीत गायचे आणि बतुकम्मा खेळायचे हाच कार्यक्रम असतो. आजचा दिवस तसा खूप मौजेचा ही मानल्या जाते.

सातवा दिवस :- वेपकायला बतुकम्मा

सातव्या दिवसास वेपकायला बतुकम्मा अस म्हटले जाते, वेपकायला म्हणजे कडूलिंबाच बी, आजच्या दिवशी शिरा व पिटा पासून बनलेलं पदार्थ कडूलिबसारख बनवल्या जाते.

आठवा दिवस :- वेंनामुद्दला बतुकम्मा

आठव्या दिवसास वेंनामुद्दला बतुकम्मा असे म्हटले जाते. वेंनामुद्दला म्हणजे दुधावरची साय, या दिवशी माँ दुर्गास तीळ,गुळ त्यात साय आणि गाईचे तूप यापासून बनवलेले प्रसाद दिल्या जात.

नववा दिवस :- सद्दुला बतुकम्मा

या उत्सवातल्या नवव्या दिवसास सद्दुला बतुकम्मा असे म्हटले जाते.यास पेद्दा बतुकम्मा असेही म्हटले जाते. हा बतुकम्मा सणातील शेवटचा दिवस या दिवशी नवीन लग्न झालेल्या मुली माहेरी येतात अति उत्सवात हा दिवस साजरी केल्या जाते. विविध प्रकारच्या जेवणाने घरात एका प्रकारचे उत्सव निर्माण होतो.

बतुकम्माचा रूपरेषा :-

नऊ दिवस आपल्या घरा समोर शेणाचा सडा शिंपल्या जाते. वेगवेगळ्या प्रकारचे सांस्कृतिक रांगोळी देखील काढल्या जाते. पुरुषांनी आणलेल्या फुलांचा दुपारपासूनच स्त्री एका पितळाच्या पसरट पातेल्यात त्याला तेलुगुत थंम्बलम असे म्हटले जाते.त्यात फुलांचा वर्तुळाकार काठेवर तंगेड नावाचाफुल अंथरले जाते, नंतर गुलाब,झेंडू व विविध फुलांनी असे सात किव्हा त्या पेक्षा जास्तही स्थर रचल्या जाते. त्यावर हळदीच्या गौरी पुजले जाते. त्यास गौरम्मा अस म्हणतात.आणि यास आपल्या घरासमोर काढलेल्या रांगोळीच्या मध्यभागी ठेवून. ग्रामीण सांस्कृतिक लोकगीते गायली जाते,त्यात सामान्य कुटुंबातील संघर्ष,बंधू प्रेम, राज्यांचे कहाणी, इतिहासिक ,सांस्कृतिक व पारंपरिक लोकगीत गात महिलावर्ग त्या बतुकम्मा च्या भोवती खेळत असतात.मुलींनी तेलंगणा संस्कृती वेशभूषा परिधान करतात,म्हणजेच लेंगाओढणी हा पोशाख तर महिलांनी साडी नेसून एक वेगळाच उत्साह निर्माण करतात, हा सण उच्च-निच्छ, जाती धर्म ,गरीब श्रीमंत असा भेदभाव मानत नाही, या दिवशी नववरचित विवाह झालेले वधू वर्ग आपल्या जन्मगावी म्हणजेच माहेरी जातात,त्यांच्या सन्मानार्थ हा सण उत्साहात साजरी केली जाते. असे म्हटले जाते की यांच्या जीवनात परिवर्तन घडवून आणण्यासाठी ही प्रथा रुजू झाली. स्त्री

सन्मानाचा प्रतीक मानल्या गेलेल्या बतुकम्मास वर्षेनुवर्षं हा उत्सव गुण्यागोविंदाने हा बहुजन समाजात चालत आलेला आहे. नुकतेच नदी तलाव पावसाच्या पाण्याने भरलेले असतात,मृगनक्षत्रात फुलून आलेले रान डोंगरे हिरवी शाल पांघरून घेतलेले असते.म्हणून फुलं व पाणीसाठा भरपूर असतो. बतुकम्मा विसर्जन करण्यास पाणी उपलब्ध असते, सर्व महिला वर्ग ढोल ताशा च्या जयघोषात व लोकगीतांच्या संगीतमय वातावरणात गावकाठच्या नदी,तलावात बतुकम्मास विसर्जित करतात.या सणाच्या पाच दिवसात नित्यनेमाने हा क्रम असतो, शेवटच्या दोन दिवस मुख्य सण मानले जाते त्यास सुधा बतुकम्मा व पेद्दा बतुकम्मा असे म्हटले जाते. एक हजार वर्षपासून सुरू असलेल्या या सांस्कृतिक परंपरेने येथील जनतेचा आनंदमय दिन उजळून येते.एकमेकांच्या उदंड आयुष्याचे साकडे घालत बतुकम्मास नदीत/तळ्यात शेवटी निरोप देतात.

(बतुकम्मा चे ऐतिहासिक चित्र)

भारतदेश हा सण, संस्कृतीने नटलेला देश आहे. प्रत्येक राज्यात विविध जाती धर्माचे विविध सण, उत्सव आनंदाने साजरी करतात, काही राज्यांचे विशिष्ट सण, उत्सव असतात. प्राचीन संस्कृतीला जपत परंपरागत चालत आलेल्या उत्सवांना आनंदाने साजरी करतात. तेलंगणा राज्याला जवळपास पाच हजार वर्षा पासूनचा संस्कृतिक इतिहास आहे. हिंदूंचे काकतीया वंश, मुस्लिमचे कुतुबशाही आणि आसफ जाही राजवंश ज्यास हैद्राबादचे निजाम म्हटले गेले. इत्यादी शासक राजवंशाच्या शाही गादीच्या इतिहासाने भारतातील हा एक लक्षवेधी सांस्कृतिक राष्ट्र बनला. कला व संस्कृती ने तेलंगणा राज्याला दिलेल्या वह सांस्कृतिक राष्ट्राची उपमा आजच्या परंपरा तश्याच चालत आलेल्या सांस्कृतिक उत्सव, महोत्सव कडे पाहून आजही हा राष्ट्र सांस्कृतिक दृष्ट्या एक प्रमुखच बनलं. 'काकतीया महोत्सव असो दक्कन महोत्सव' या सारख्या अनेक हिंदू सणा सोबतच बोणाल्, बतुकम्मा, उगादी, दशरा, संक्रांती, मिलद अन नबी आणि रमजान हे इथले प्रमुख सण आहेत. माञ या सणातील राष्ट्रीय सण मानल्या जाणारा सण म्हणजे बतुकम्मा. हा सण गेले एक हजार वर्षांपासून साजरी केली जाते, या सणाला तेलंगणात सर्वात जास्त महत्व दिले जाते.

- श्रीपाद राऊतवाड